HUNTSMAN

Enriching lives through innovation













HUNTSMAN मध्ये काम करणे • विक्रेत्यांची अचारसंहिता

# विहंगावलोकन

Huntsman ने त्यांच्या व्यवसाय संबंधित पद्धतिंसाठी आचार मानदंड स्थापित केले आहेत जे आमच्या व्यवसाय आचार मार्गदर्शक सूचानांमध्ये दिले आहेत. या Huntsman व्यवसाय आचार मार्गदर्शक सूचना ("गाईडलाइन्स"), इमानदारी, प्रामाणिकपणा, एकाग्रता, आणि जबाबदारी या आपल्या मूल्यांच्या प्रती आपली बांधीलकी दर्शवतात. Huntsman ची अपेक्षा आहे कि त्यांचे विक्रेते आमच्या नियामकांचे पालन करण्याच्या आमच्या बांधिलकी सहित ही मूल्ये स्विकारतील आणि दुस-यांबरोबर ती वाटतील.

विक्रेते Huntsman पासून स्वतंत्र घटक असले तरी, Huntsman बरोबर किंवा Huntsman च्या वतीने व्यवसाय करत असताना, एका विक्रेत्याच्या व्यवसाय पद्धती आणि कृतिंचा आमच्या कंपनी वर मोठा प्रभाव पडणे आणि परावर्तन होणे शक्य आहे. या कारणाने Huntsman ची अपेक्षा आहे की सर्व विक्रेते आणि त्यांचे कामगार, अभिकर्ता, उप कंत्राटदार ("प्रतिनिधि") जेंव्हा आमच्या बरोबर किंवा आमच्या वतीने व्यवसाय करतात तेंव्हा ते या मार्गदर्शक सूचनांत दिलेल्या आमच्या उच्च नैतिक मानदंडांचे अनुसरण करतील.

Huntsman च्या अपेक्षा समजून घेण्याची आणि त्यांचे पालन करण्याची जबाबदारी आमचे विक्रेते आणि प्रतिनिधी यांची आहे. विक्रेत्यांनी Huntsman व्यवस्थापन सदस्याला सूचित करावे जर आणि जेंव्हा अशी कोणतीही परिस्थिती निर्माण झाली ज्याच्यामुळे विक्रेता किंवा प्रतिनिधिला असे कार्य करावे लागेल जे Huntsman च्या अपेक्षांच्या विरुद्ध असेल. एखाद्या विक्रेता किंवा प्रतिनिधीची वागणूक या मार्गदर्शक सूचना किंवा कोणत्याही Huntsman धोरणाच्या विरुद्ध आहे असे आम्हाला वाटल्यास Huntsman त्यांना काढण्याची विनंती करू शकते.

### विक्रेते आणि प्रतिनिधिंची अपेक्षित वर्तणूक

Huntsman बरोबर किंवा Huntsman च्या वतीने व्यवसाय करताना, सर्व विक्रेते व प्रतिनिधिंकडून अपेक्षा आहे की ते त्यांचे व्यावसायिक संप्रेषण आणि कार्ये प्रामाणिकपणे आणि आपापल्या देशांच्या लागू कायद्यांचे व नियमांचे अनुपालन करून करतील. Huntsman ची अपेक्षा आहे की त्यांचे विक्रेते आणि प्रतिनिधी मानवी अधिकार आणि कामाच्या कार्यालयात समान संधीच्या त्यांच्या बांधिलकित सहभागी होतील. Huntsman बरोबर विक्रेत्याच्या करारांतर्गत असेल्या दायीत्वांसकट, सर्व विक्रेते आणि प्रतिनिधीं यांनी आमचे नैतिक मानदंड पाळावेत अशी आवश्यकता आहे, ज्यात समाविष्ट आहे नियामक अनुपालन, व्यावसायिक पद्धती आणि रोजगारीच्या क्षेत्रात अपेक्षित वर्तणूक. या अपेक्षांचा सारांश या दस्तऐवजात नोंदला आहे.

**Huntsman व्यवसाय आचार मार्गदर्शक सूचनांचा संपूर्ण मजकूर www.huntsman.com इथे मिळेल.**

## I. अपेक्षित नियामक पालन पद्धती

**विक्रेते आणि त्यांच्या प्रतिनिधिंकडून अपेक्षा आहे की:**

- त्या एंटायट्रस्ट आणि निष्पक्ष स्पर्धा कायद्यांचे अनुपालन करून व्यवसाय चालवायचा, जे त्या अधिकारक्षेत्रांचे व्यवस्थापन करतात ज्यांच्यामध्ये ते उद्योग करतात;
- ज्या देशांत उद्योग चालवतात तिथल्या भ्रष्टाचार विरोधी कायद्यांचे पालन करावे;
- अन्य व्यक्ती किंवा जर कोणी सरकारी किंवा सार्वजनिक एजन्सी चा सेवक असल्यास त्याच्यावर किंवा तिच्यावर दबाव आणायच्या हेतूने प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्षपणे पैसे न द्यावे, पैसे देण्याचा प्रस्ताव न मांडावा, पैसे देण्यास सहायता न करावी किंवा काही बहुमूल्य न देणे;
- सर्व लागू पर्यावरणविषयक कायदे आणि नियमांचे पालन करावे;
- नियामक एजन्सी प्रतिनिधी आणि सरकारी अधिकाऱ्यांशी चर्चा करताना प्रामाणिक आणि सत्यवचनी राहावे;
- Huntsman च्या कामांच्या अनेक पैलूंना लागू असलेल्या सर्व लागू व्यापार नियंत्रण कायद्यांचे पालन करावे;
- Huntsman वर अयोग्य बहिष्कार मागणी न लादावी.

## II. अपेक्षित व्यवसाय आचरण

**विक्रेते आणि त्यांच्या प्रतिनिधिंकडून अपेक्षा आहे की:**

- सर्व व्यवसायिक माहिती प्रामाणिकपणे आणि अचूकपणे नोंदवावी व कळवावी आणि त्यांच्या पूर्णतेच्या आणि अचूकतेच्या बाबतीत सर्व लागू कायद्यांचे पालन करावे.
- Huntsman आणि इतरांच्या बौद्धिक मालमत्ता आधिकारांचे अनुपालन करावे ज्याच्यांमध्ये समावेश आहे पण त्यांच्यापुरते सीमित नाही आहे पेटंट, ट्रेडमार्क आणि व्यापार गुपिते आणि सॉफ्टवेर, हार्डवेर आणि सामग्रीचा वापर फक्त त्यांच्या संबंधित परवाना आणि वापराच्या अटींच्यानुसार करावा;
- Huntsman च्या भौतिक आणि बौद्धिक मालमत्तेचे संरक्षण करावे व ती जबाबदारिने वापरावी;

Huntsman ची परवानगी असल्यावरच अशी मालमत्ता वापरावी;

Huntsman ने दिलेले माहिती तंत्रज्ञान आणि प्रणाली (ईमेल सह) मुख्यतः Huntsman च्या व्यवसाय संबंधित कामांसाठी आणि लागू Huntsman धोरणानुसार वापरावी;

Huntsman चे धोरण विक्रेत्यांना आणि प्रतिनिधिंना बंदी घालते Huntsman ने पुरवलेली संपत्ति, तंत्रज्ञान किंवा प्रणाली अशी कोणतीही सामग्री निर्माण करण्यास, सामग्री पर्यंत प्रवेश मिळवण्यास, संग्रहित करण्यास, प्रिंट करण्यास, मागण्यास किंवा पाठवण्यास जी छळवणूक करणारी, विभेदनकारी, अपमानास्पद, हिंसेची धमकी देणारी किंवा त्याचप्रमाणे अयोग्य किंवा बेकायदेशीर आहे;

- Huntsman च्या आंतरिक कंपनी नेट्वर्क, प्रणाली आणि इमारतिंमध्ये प्रवेश मिळवण्यासाठी अट आहे की Huntsman च्या संकेतशब्द देखबाल, गोपनियता आणि सुरक्षा बाबत आवश्यकतांचे अनुसरण आणि Huntsman च्या गुप्तता कार्यपद्धतिंचे पालन;

- Huntsman सहकार्यांना भेटवस्तु किंवा मनोरंजन देऊ करताना चांगली पारख आणि नियंत्रण दाखवावे;

साधारणतः, विक्रेता आणि प्रतिनिधिंनी Huntsman सहकार्यांना $५० USD पेक्षा अधिक मूल्याची एक स्वतंत्र भेट किंवा एका १२ महिन्यांच्या अवलोकन कालावधित एकंदर $१२५ USD पेक्षा अधिक मूल्याच्या भेटवस्तूंचा संयोग देणे टाळावे;

विक्रेता आणि प्रतिनिधिंनी काम मिळवण्याच्या किंवा टिकवण्याच्या हेतूने एका Huntsman सहकार्याला कधीही लाच, रिशवत, किंवा वस्तू वा सेवासाठी विनिमय व्यवस्था किंवा कोणतेही इतर प्रोत्साहान देऊ करू नये;

कोणत्याही दिलेल्या किंवा प्राप्त झालेल्या भेटी किंवा करमणुकीने कायद्याचे अनुपालन करावे आणि Huntsman धोरणाचे उल्लंघन करू नये;

- कोणताही वास्तविक किंवा ध्येयांमधील विरोधाभासाचा आभास पण टाळावा.

विक्रेतांनी किंवा प्रतिनिधिंनी अश्या कुठल्याही Huntsman सहकारी बरोबर वाटाघाटी दरम्यान किंवा अन्य वेळी थेट व्यवहार करू नये ज्याची पती/पत्नी किंवा इतर कौटुंबिक सदस्य किंवा इतर कोणी निकटी संबंधी विक्रेत्याच्या व्यवसायात नौकरी करतात किंवा विक्रेत्यात किंवा त्याच्या व्यवसायात त्यांचे खाजगी किंवा आर्थिक लक्ष्य आहे;

- जेंव्हा Huntsman किंवा अन्य कंपनिबद्दल पैसे गुंतवणाऱ्या जनतेला नसलेली माहिती आमच्याकडे असेल आणि जी एका गुंतवणूकदाराच्या शेअर खरेदी विक्री करायच्या निर्णयावर प्रभाव करु शकते, तेंव्हा Huntsman किंवा अन्य कंपनीचा शेअर खरेदी किंवा विक्री करून इन्सायडर ट्रेडिंग टाळावे; आणि

- व्यावसायिक नोंदी तयार करणे, साठवणे आणि विल्हेवाट लागू कायदे व नियामक आवश्यकतांचे पूर्ण अनुपालन करून करावे.

## III. अपेक्षित रोजगार पद्धती

**विक्रेते आणि त्यांच्या प्रतिनिधिंकडून अपेक्षा आहे की:**

- लैंगिक किंवा इतर छळ आणि भेदभावापासून मुक्त कामाचे ठिकाण पुरवण्याच्या Huntsman च्या बांधीलकिला सहकार्य द्यावे;
- कामाचे सुरक्षित आणि निरोगी वातावरण पुरवावे आणि सर्व लागू सुरक्षा आणि आरोग्य कायद्यांचे, नियमांचे आणि पद्धतिचे अनुपालन करावे;
- Huntsman च्या मालकीच्या किंवा भाड्याच्या जागेवर असताना अवैध द्रव्यांचा वापर, ताबा, वितरण आणि विक्री प्रतिबंधित असावी;
- केवळ ऐच्छिक कामगारांचा वापर करा; वेठबिगारांचा वापर, करारबद्ध कामगार स्वरूपात किंवा अन्य स्वरूपात, प्रतिबंधित आहे;
- स्थानिक वेतन आणि तास व किमान वय कायद्यांचे आणि आवश्यकतांचे पालन करावे; बालमजुरीचा वापर प्रतिबंधित आहे; आणि
- स्थानिक आणि राष्ट्रीय नियमांनुसार कर्मचारी नोंदी जपून ठेवाव्या.

### समस्या नोंदवणे आणि सहाय्य विनंती

एकाद्या विक्रेता किंवा प्रतिनिधिचा विशिष्ट परिस्थिती बद्दल एक प्रश्न असल्यास, किंवा, समस्या किंवा बाबी नोंदवायची गरज असल्यास त्यांना Huntsman च्या प्राथमिक संपर्क कारकाबरोबर काम करून एक व्यावसायिक पद्धती किंवा अनुपालनाच्या अडचणीच्या निराकरणासाठी प्रोत्साहन दिले जाते. तथापि Huntsman ला जाणीव आहे कि अश्या वेळा असू शकतात जेंव्हा हे शक्य किंवा योग्य नसू शकते.
अशा परिस्थितित एक विक्रेता किंवा प्रतीनिधीने:

- Huntsman च्या Ethics and Corporate Compliance Department शी +१.२८१.७१९.६००० वर संपर्क साधावा.
- Speak Up हेल्पलाइनला फोन करावा, ही हेल्पलाइन www.huntsman.com/speakup वर सापडेल, किंवा,
- Huntsman च्या Ethics and Corporate Compliance Department ला ethics@huntsman.com ह्या पत्त्यावर इंटरनेटद्वारे ईमेल पाठवावा.

Huntsman अन्य व्यक्ति विरुद्ध प्रत्याघात सहन करत नाही. जो कोणी सद्भावनेने एका संशयित कायदेशीर किंवा धोरण उल्लंघनाची बातमी कळवेळ त्याला असा अहवाल नोंदवण्यासाठी प्रत्याघाताला सामारे जावे लागणार नाही. सद्भावना म्हणजे ती व्यक्ति, जी सर्व माहितिबरोबर समोर येत आहे, असा विश्वास करते की ती एक प्रामाणिक, सच्चा आणि पूर्ण अहवाल नोंदवत आहे.

HUNTSMAN

Enriching lives through innovation

**Global headquarters**
Huntsman Corporation
10003 Woodloch Forest Drive
The Woodlands
Texas 77380
USA
Telephone +1 281 719 6000
Fax +1 281 719 6416

www.huntsman.com

Copyright © 2017 Huntsman Corporation or an affiliate thereof. All rights reserved.

The use of the symbol ® herein signifies the registration of the associated trademark in one or more, but not all, countries.